जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:- sp.jalgaon@mahapolice.gov.in

## -:प्रेस नोट :-

दिनांक :- ११/०६/२०२६

**" जळगाव जिल्हा पोलीस दलाची ऐतिहासिक कामगिरी : एकुण २,१६,८४,९३०/- रुपये किमंतीचा मुद्देमाल फिर्यादींना हस्तांतरण करण्यात आला"**

**जळगाव जिल्हा पोलीस दलाची ऐतिहासिक कामगिरी करत एकुण २,१६,८४,९३०/- रुपये किमंतीचा मुद्देमाल फिर्यादींना हस्तांरणर करण्यात आला सदर कार्यक्रम जळगांव जिलहयाचे पालकमंत्री मा. श्री. गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला असुन, सदर कार्यक्रमातला प्रमुख पाहुणे म्हणुन मा. जलसंपदा मंत्री श्री. गिरीश महाजन व मा. वस्त्रोउद्योग मंत्री श्री. संजय सावकारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली असुन जळगांव जिहयातील विधानसभा-विधापरिषद सदस्य यांचेसह जिल्हयाती प्रतिष्ठित नागरिक नागरिकांची उपस्थित होते.**

नागरिकांचा पोलीस यंत्रणेवरील विश्वास अधिक दृढ व्हावा, गुन्ह्यांमध्ये चोरीस गेलेला अथवा हरविलेला मुद्देमाल शक्य तितक्या लवकर शोधून मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात यावा तसेच गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण व्हावा, या उद्देशाने **मा. पोलीस अधीक्षक, जळगाव श्री. श्रीकांत धिवरे, भा.पो.से. यांच्या** मार्गदर्शनाखाली जळगाव जिल्हा पोलीस दलाने सन-२०२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

दिनांक ११ जुलै, २०२६ रोजी आयोजित **"मुद्देमाल हस्तांतरण मोहिमे"** अंतर्गत विविध गुन्ह्यांमध्ये हस्तगत करण्यात आलेला **एकूण २,१६,८४,९३०/- (रुपये दोन कोटी सोळा लाख चौर्यांऐंशी हजार नऊशे तीस फक्त)** किमतीचा मुद्देमाल संबंधित फिर्यादींना कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करून सुपूर्द करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून **मा. श्री. गुलाबराव पाटील**, मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता), महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, जळगाव जिल्हा उपस्थित राहणार असून **मा. श्री. गिरीश महाजन**, मंत्री (जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य तसेच **मा. श्री. संजय सावकारे**, मंत्री (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र राज्य हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## जळगाव परिमंडळाची उल्लेखनीय कामगिरी:-

जळगाव परिमंडळातील विविध पोलीस ठाण्यांनी चोरी, घरफोडी, जबरी चोरी, फसवणूक व इतर मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये प्रभावी तपास करून **एकुण ७३,५२,२०८/- किमतीचा** मुद्देमाल हस्तगत केला. या मुद्देमालामध्ये ८४ मोबाईल फोन, ३०८.७३ ग्रॅम सोन्याचे दागिने, १८५.४६ भार चांदी, १,९५,०००/- रोख रक्कम, २१ मोटारसायकली, १ चारचाकी वाहन, १ रिक्षा तसेच इतर मौल्यवान वस्तूंचा समावेश आहे.

## चाळीसगाव परिमंडळाची उल्लेखनीय कामगिरी :-

चाळीसगाव परिमंडळातील विविध पोलीस ठाण्यांनी उत्कृष्ट तपास करून **एकुण १,१६,१६,२२२/-** किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. या मुद्देमालामध्ये ३३३ ग्रॅम सोन्याचे दागिने, ९७ भार चांदी, एकुण २४,६८,६६०/- रोख रक्कम, ७५ मोबाईल फोन, १५ मोटारसायकली, २ चारचाकी वाहने, ३ बँक खाती तसेच इतर मौल्यवान मुद्देमालाचा समावेश आहे.

## सायबर पोलीस स्टेशनची उल्लेखनीय कामगिरी:-

जळगाव जिल्हा सायबर पोलीस स्टेशनने सायबर गुन्ह्यांच्या तपासात तांत्रिक कौशल्याचा प्रभावी वापर करून हरविलेले व विविध प्रकरणांतील **एकुण २०७ मोबाईल** फोन शोधून काढले. **एकुण २७,६१,५००/- किंमतीचे** हे मोबाईल फोन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संबंधित नागरिकांना परत करण्यात आले. सायबर पोलीस स्टेशनच्या या कामगिरीमुळे ऑनलाइन गुन्ह्यांतील पीडितांना मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांचा सायबर पोलीस यंत्रणेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

## असा एकूण मुद्देमाल हस्तांतरण करण्यात आला :-

**जळगाव परिमंडळ, चाळीसगाव परिमंडळ व जळगाव जिल्हा सायबर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून एकूण २,१६,८४,९३०/- किमतीचा मुद्देमाल संबंधित फिर्यादींना परत करण्यात येत आहे.**

## उत्कृष्ट तपास, न्यायालयीन यश व विशेष कामगिरी सत्कार समारंभ :-

सन-२०२६ मध्ये जळगाव जिल्हा पोलीस दलाने खून, बलात्कार, पॉक्सो, एटीएम चोरी, अज्ञात मृतदेहांची ओळख, मालमत्तेविरुद्धचे गुन्हे व इतर गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचा शास्त्रशुद्ध तपास करून अनेक आरोपींना न्यायालयाकडून कठोर शिक्षा मिळवून दिली. वैज्ञानिक पुरावे, फॉरेन्सिक तपास, डिजिटल पुरावे आणि सीसीटीव्ही विश्लेषणाचा प्रभावी वापर करून गुन्ह्यांचा उलगडा करण्यात आला. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल तपास अधिकारी, सरकारी अभियोक्ता, फॉरेन्सिक अधिकारी व पोलीस अंमलदाराचा **प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.**

*“ **मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रमाच्या अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे यांनी नागरिकांना आवाहन केले की,** कोणताही गुन्हा घडल्यास अथवा संशयास्पद घटना निदर्शनास आल्यास तात्काळ पोलीसांशी संपर्क साधावा. नागरिकांनी वेळेवर दिलेली माहिती आणि सहकार्य हे गुन्ह्यांचा उलगडा, आरोपींची अटक तसेच गुन्ह्यातील मुद्देमालाचा शोध घेऊन तो मूळ मालकांच्या ताब्यात देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. प्रत्येक नागरिकाच्या कष्टाने कमावलेल्या संपत्तीचे संरक्षण करणे ही जळगाव जिल्हा पोलीस दलाची सर्वोच्च जबाबदारी असून, नागरिकांच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी पारदर्शक, संवेदनशील आणि नागरिकाभिमुख पोलीसिंगच्या माध्यमातून आम्ही सदैव कार्यरत राहू. सुरक्षित, विश्वासार्ह आणि गुन्हेमुक्त जळगाव घडविण्यासाठी पोलीस व नागरिक यांचे परस्पर सहकार्य हीच सर्वात मोठी ताकद आहे.”*

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव**

**प्रति,**

**सर्व संपादक/वार्ताहार**
**प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिक मिडीया**
**२/- जनहितार्थ प्रसारण करीता**

*********************************************************************************************************


महाराष्ट्र पोलीस
पाटील,
तथा पालक मंत्री जळगांव जिल्हा.
सभा मतदार संघ
हाजन,
महामंडळ) आपत्ती व्यवस्थापन
मतदार संघ.
वकारे,
राज्य,


-: मुद्देमाल सुपर्दगी मोहिम :-
दिनांक - ११ जुलै २०२६.
-:अध्यक्ष :-
महाराष्ट्र पोलीस





-: मुद्देमाल सुपुर्दगी मोहिम :-
दिनांक - ११ जुलै २०२६.
महाराष्ट्र पोलीस
-:अध्यक्ष :-
मा.श्री. गुलाबराव पाटील.


-: मुद्देमाल सुपुर्दगी मोहिम :-
महाराष्ट्र पोलीस
मा.श्री. निरंफ महाजन.
मा.श्री. संजय सावकारे.


-: मुद्देमाल सुपुर्दगी मोहिम :-
मा.श्री. गुलाबराव पाटील,
गिरीश महाजन,
मा.श्री. संजय सावकारे,
महाराष्ट्र पोलीस